# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र   जिल्हा District: मुंबई   पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि   पहिली खबर क्र. FIR No.: २२   वर्ष Year: २०२५   दिनांक Date: २०/०८/२०२५

2. (i) अधिनियम Act: ला.प्र. अधिनियम १९८८   कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act ...   कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: शुक्रवार.   तारीख पासून Date from: ०५/०८/२५   वेळ Time ...   तारीख पर्यंत Date to: १९/०८/२५   वेळ Time: १८.०५

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००   (2) ०३.०० ते ०६.००   (3) ०६.०० ते ०९.००   (4) ०९.०० ते १२.००   (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००   (7) १८.०० ते २१.००   (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.   तारीख Date: ०५/०८/२५   वेळ Time ...

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ०२/२५   तारीख Date: २०/०८/२०२५   वेळ Time: ०५.१० वा

4. माहितीचा प्रकार Type of Information: समक्ष   लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ...   चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.   Chouki / Beat / O. P. Name and No.

घनकचरा व्यवस्थापन विभाग, M वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका कुर्ला मुंबई-४०००७०

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ...   ठिकाणाचे नंबर No. if any ...   गल्ली Ward ...   रस्त्याचे नाव Name of road ...

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ...   गाव Village ...   पोस्ट Post ...   तालुका Taluka ...   जिल्हा Dist. ...   राज्य State ...

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ...   तालुका Taluka ...   जिल्हा Dist. ...   राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: दिपिका डोंगारणे   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: बाजीराव डोंगारणे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ३८ वर्षे   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय   फोन नं. Phone No.: ९५९४९६८४५०

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ...   दिल्याचा दिनांक Date of issue ...   दिल्याचे ठिकाण Place of Issue ...   (f) व्यवसाय Occupation ...

(g) धर्म Religion: हिंदू   जात Caste ...   जनजात Sub-Caste ...

(h) पत्ता Address ...   गल्ली/सर्व्हे नं. Ward ...   घर/नाव नं. House Name No. ...   फोन/मो. नं. Phone No. ...   पॅन नं. Pan No. ...   वोटर्स नं. Card No. ...

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई-20

रस्त्याचे नाव Road ...   जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place   गाव Village   पोस्ट Post   पो. स्टे. P. Stn. ...

तालुका Taluka ...   जिल्हा Dist. ...   राज्य State ...   सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

राधेश्याम विजयप्रसाद जैस्वाल, वय ४८ वर्षे, व्यवसाय - दुय्यम अभियंता कार्यालय - घनकचरा व्यवस्थापन विभाग, M वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई-०७, रा. ठि. रूम नं ०३, तळमजला, ०५, महानंदा सोसायटी, सरळा नगर, कॉम्पलेक्स, मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व.

फिर्याद                दिनांक २०/०८/२०२५

दिपिका आजीराव डंगारणे वय ३८ वर्षे, व्यवसाय- नोकरी (सहाय्यक पोलीस आयुक्त) कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग मुंबई यांचा स्वतंत्र कागदावर टंकलिखित करण्यात आलेली फिर्याद तीच गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात यावी.

समक्ष

(दयानंद सावंत)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

(दिपिका डंगारणे)
स.पो.आ.
ला.प्र.वि.मुंबई

# फिर्याद

दिनांक २०/०८/२०२६

मी, दिपीका बाजीराव डंगारणे, वय ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी (सहाय्यक पोलीस आयुक्त), नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई,मो.क्र. ९५९४९६८४५०.

मी वरील प्रमाणे असुन, दिनांक २१/०८/२०२५ रोजी पासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक पदावर नेमणुकीस होते. दिनांक ०७/०५/२०२६ पासुन 'सहाय्यक पोलीस आयुक्त' या पदावर कर्तव्य करित आहे.

मी दिनांक १९/०६/२०२६ रोजी कर्तव्यावर असताना, मला समजले की, पो.नि. रजनी उंबरकर या वैयक्तिक कारणास्तव रजेवर जाणार असल्याने त्यांच्याकडे चौकशीकरिता असलेली पडताळणी क्र. ४२/२०२६ मध्ये पुढील चौकशी अधिकारी म्हणुन वरिष्ठांच्या आदेशाने माझी नेमणुक झाली आहे. तसेच नमुद पडताळणी कारवाई मध्ये पर्यवेक्षक अधिकारी म.पो. आ. दयानंद सावंत हे आहेत असे समजले. नमुद पडताळणी कारवाईचे कागदपत्र पो.नि.रजनी उंबरकर यांचेकडून ताब्यात घेऊन त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये तक्रारदार यांचा दिनांक १५/०६/२०२६ रोजीचा अर्ज, त्याच्या सोबत तक्रारदार यांनी सहाय्यक अभियंता, घकव्य, ए वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालीका, फोर्ट, मुंबई ०१ या कार्यालयामध्ये दिनांकीत २२/०५/२०२६ रोजी केलेला अर्ज, तसेच दिनांक १५/०६/२०२६ व दि.१६/०६/२०२६ रोजीचे पडताळणी पंचनामे असल्याचे दिसुन आले.

तक्रारदार महिला पुष्पा कमलुरी यांच्या तक्रारीची हकीकत अशी की, ''तक्रारदार महिला या वर नमुद पत्त्यावर त्यांचे कुटूंबियांसह राहतात. सदर ठिकाणीच राहते घरी मागील चारवर्षापासून त्या घरगुती जेवणाचा (क्लाऊड किचन) व्यवसाय करीत आहेत. त्यांच्या राहत्या घरातील किचनची ड्रेनेज लाईन छोटी असून त्यांना व्यवसायाच्या निमित्ताने किचनची दुरुस्ती करून घरासमोरील गल्लीमधील गटारची लाईन चेंबर्ससह नवीन बांधून घेण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परवानगीची आवश्यकता होती. याकरीता तक्रारदार महिला यांनी दि. २६/०५/२०२६ रोजी मा. सहायक अभियंता (घकव्य), ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, १३४, शहीद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ०१ यांना लेखी अर्ज दिला. नमुद अर्जाविषयी त्यांनी मनपाच्या डिसपॅच विभागामध्ये विचारणा केली असता. त्यांचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी जैस्वाल साहेब, सहायक अभियंता यांचेकडे जाणार असल्याचे समजले. त्यानुसार तक्रारदार महिला जैस्वाल साहेब यांना जावून भेटून त्यांचे अर्जाबाबत माहिती दिली असता. जैस्वाल यांनी त्यांचा स्टाफ पाहणी करण्यासाठी येईल असे सांगितले. त्यानंतर मनपा स्टाफ पाहणीसाठी न आल्याने दि. २९/०५/२०२६ रोजी तक्रारदार महिला पुन्हा याबाबत पाठपुरावा करण्यासाठी जैस्वाल साहेब यांना भेटल्या व अदयाप कोणीही पाहणी करण्यासाठी आले नसल्याचे सांगितले, तेव्हा त्यांनी त्यांचा स्टाफ सोलंकी यांना पाठवतो असे सांगितले व जैस्वाल यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक ९०९६२०८९३१ हा संपर्कासाठी दिला. त्यामुळे तक्रारदार महिला त्यांचे कामाबाबत जैस्वाल यांचेकडून फोनवरुन पाठपुरावा घेत होत्या. अंदाजे दि.०१/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वा चे सुमारास जैस्वाल यांनी त्यांचेकडील स्टाफ सोलंकी यांना साईट व्हिजीटसाठी पाठविले व त्यांनी गल्लीतील गटार लाईनची पाहणी केली. सोलंकी यांनी साईट व्हिजीट केल्यानंतर अंदाजे दि. ०३/०६/२०२६ रोजी तक्रारदार महिला पुन्हा याबाबत चौकशी करण्यासाठी ए वॉर्ड बी एम सी कार्यालय येथे गेल्या व जैस्वाल साहेब यांना भेटल्या, तेव्हा जैस्वाल साहेब यांनी त्यांना '' ठीक है मैं देखाता हूँ, बताता हूँ आपको '' असे बोलले. त्यानंतर देखील तक्रारदार महिला यांना परवानगी मिळाली नाही म्हणून त्यांनी पुन्हा दि. ०५/०६/२०२६ रोजी सदर कार्यालयात जावून जैस्वाल साहेबांची भेट घेतली, सदरवेळी वारंवार त्यांचेकडे विचारणा करण्यासाठी तक्रारदार महिला जात असल्याने जैस्वाल त्यांचेवर रागवले. त्यामुळे काही वेळाने त्यांनी जैस्वाल यांना त्यांचे मोबाईलवर कॉल केला व '' साहेब ऐसे क्यू सबके सामने चिल्ला रहे हो, मेरा परमिशन का काम कब होगा '' असे विचारले असता त्यांनी त्यांना '' मैं टेन्शन में था, तो भडक गया, आप सोमवार को आओ मिलने के लिए '' असे सांगितले. तेव्हा तक्रारदार महिला त्यांना '' सर मैं कब से चक्कर कॉंट रही हूँ, घूम रही हूँ, मेरा परमिशन का काम कर दिजिए '' असे सांगितले असता, जैस्वाल यांनी त्यांना सदर कामासाठी सव्वा लाख रुपये लागतील असे बोलून तक्रारदार महिला यांचेकडे पैश्याची मागणी केली. तेव्हा तक्रारदार महिला यांनी त्यांना गटारचे काम त्या त्यांचे स्वखर्चाने करत असून एवढे पैसे देणे त्यांना शक्य होणार नाही असे सांगितले असता जैस्वाल यांनी यांना '' ठिक है फिर सोमवार को फोन करके आजाओ, तब देखते है '' असे सांगितले, त्यावर तक्रारदार महिला यांनी त्यांना '' सोमवार को मैं गाव जा रही हूँ, गाव से आने के बाद आऊँगी '' असे सांगितले. दि. १२/०६/२०२६ रोजी तक्रारदार महिला गावाहून परत आल्या परंतु अद्यापपर्यंत त्यांना गटारीचे लाईनचे काम करण्याची परवानगी मिळालेली नसल्याचे समजले. तक्रारदार हे लोकसेवक जैस्वाल यांना, त्यांनी मागणी केल्याप्रमाणे पैसे देत नाही, त्यामुळे त्यांनी तक्रारदार महिला यांचे गटार लाईन व चेंबर्स दुरुस्तीसाठी परवानगी

दिलेली नाही. लोकससेवक जैस्वाल साहेब हे तक्रारदार यांचेकडे परवानगीसाठी रू.१,२५,०००/- (अक्षरी एक लाख पंचवीस हजार) रुपयांची लाचेची मागणी करीत असल्याने व तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे दिनांक १५/०६/२०२६ रोजी तक्रारदार हया तक्रार देण्यासाठी ॲन्टी करप्शन ब्युरो, वरळी येथे हजर झाल्या. तक्रारदार महिला कमलुरी यांचे, जैस्वाल साहेब यांचेसोबत कोणतेही आर्थिक देवाण-घेवाणीचे व्यवहार नाहीत. जैस्वाल साहेब हे मागणी करीत असलेली रू.१,२५,०००/-ची रक्कम त्यांचे कायदेशिर मोबदला किंवा फि व्यतिरीक्त केवळ लाचेच्या उददेशाने मागितलेली असल्याची तक्रारदार महिला कमलुरी यांची खात्री असल्याने व सदर रक्कम त्यांना देण्याची कोणतीही इच्छा नसल्याने लोकसेवक यांचेविरूदध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये योग्य ती कार्यवाहीकरिता सदर तक्रार अर्ज त्यांनी दिला आहे.''

दिनांक १५/०६/२०२६ रोजी तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने पो.नि. रजनी उंबरकर यांनी प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) प्रविण विनायकराव मुंदे, वय ३६ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद - पर्यवेक्षक, कार्यालयीन पत्ता - प्रधान मुद्रांक कार्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, नगर भवन, फोर्ट, मुंबई ४००००१. २) विनोद विष्णुसा गुजर, वय ४७ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद - लिपीक टंकलेखक, कार्यालयीन पत्ता - प्रधान मुद्रांक कार्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, नगर भवन, फोर्ट, मुंबई ४००००१ यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर त्यांना तक्रारदार, त्यांचे तक्रारीविषयी थोडक्यात माहिती सांगीतली, तसेच पंचांना तक्रारदारांचा मराठीत संगणकीकृत केलेला अर्ज वाचण्यास दिला व त्यावर समक्ष म्हणुन पो.नि. रजनी उंबरकर व दोन्ही पंचांची स्वाक्षरी घेऊन पो.नि. रजनी उंबरकर यांनी सदरचा अर्ज ताब्यात घेतला.

तद्नंतर तक्रारदार यांना लोकसेवक यांनी भेटण्यास येण्यापुर्वी फोन करून येण्यास सांगितले असल्याने लोकसेवक यांचे भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी तक्रारदार या लोकसेवकास फोनद्वारे संपर्क करतील व त्यांच्यात होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मायक्रो एसडी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानुसार पो.ह. मिंडे यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ७९०००९३९३८ वरून स्पीकर ऑन करून लोकसेवक जैस्वाल यांस त्यांचे मोबाईल नं. ९०९६२०८९३१ वर कॉल करून सदरचा कॉल ध्वनिमुद्रीत करण्यात आला. नमुद संभाषणामध्ये तक्रारदार यांनी लोकसेवकास भेटण्याबाबत विचारणा केली असता, लोकसेवकाने दुसऱ्या दिवशी दिनांक १६/०६/२०२६ रोजी येण्यास सांगितल्याने दिनांक १५/०६/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करून सदरबाबत पंचनामा कारवाई करण्यात आली.

तदनंतर पुन्हा दिनांक १६/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली. सदरवेळी तक्रारदार या महिला असल्याने त्यांनी त्यांचे सोबत पुरुष पंच लोकसेवक यांचे कार्यालयात गेल्यास लोकसेवकास यांना संशय येईल असे सांगुन महिला पंचाची मागणी केली. त्यानुसार पो.नि. रजनी उंबरकर यांनी पो.ह. कावले यांचे मदतीने पंच मुंदे यांच्याबदल्यात महिला पंच श्रीमती अस्मिता मंगेश चाचे, वय ३६ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-वरीष्ठ लिपीक, कार्यालयीन पत्ता-प्रादेशिक परीवहन कार्यालय, मुंबई पश्चिम, अंधेरी, मुंबई ५३ यांना पाचारण केले. महिला पंच श्रीमती चाचे या हजर झाल्यानंतर त्यांना तक्रारदार व त्यांनी दिलेली तक्रार, झालेली पडताळणी कारवाई याविषयी थोडक्यात माहिती सांगीतली, तक्रारदारांचा मराठीतील संगणकीकृत केलेला अर्ज वाचण्यास दिला व त्यावर त्यांची स्वाक्षरी घेतली. त्यानंतर दि.१६/०६/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाईचे आयोजन झाले. सदर पडताळणी कारवाईचे वेळी तक्रारदार व लोकसेवक यांची भेट झाली व भेटीदरम्यान त्यांच्यात प्रलंबित कामाचे अनुषंगाने चर्चा झाली व लोकसेवक यांना पंचाचा संशय आला असल्याने त्यांनी लाचेच्या रक्कमेविषयी बोलने टाळले होते. लोकसेवक यांनी तक्रारदार यांना शनिवारी दि.२०/०६/२०२६ रोजी कार्यालयात भेटण्यासाठी बोलाविले असल्याने नमुद दिवशीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. सदर पडताळणी कारवाईचे वेळी झालेल्या भेटीतील संभाषण हे ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे. सदरबाबत पंचनामा कारवाई करण्यात आली.

त्यानंतर पो.नि.रजनी उंबरकर या वैयक्तिक कारणास्तव रजेवर जाणार असल्याने नमुद पडताळणी कार्यवाहीमध्ये पुढील चौकशी अधिकारी म्हणून वरिष्ठांचे आदेशाव्दारे आमची नेमणुक केल्याने कागदपत्रे ताब्यात दिले व दिनांक २०/०६/२०२६ रोजी पुन्हा पडताळणी करावयाचे असल्याचे सांगितले. तसेच तक्रारदार श्रीमती पुष्पा राजेश कमलुरी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि.१५/०६/२०२६ रोजी ला.प्र.वि. वरळी, मुंबई कार्यालयात समक्ष येवुन लोकसेवका विरोधात तक्रार दिली आहे. तक्रारदार यांचे तमिळ मध्ये शिक्षण झाले असल्याने व त्यांना मराठी व हिंदी लिहिता येत नसल्याने त्यांचा लेखी तक्रारी अर्ज हा पो.नि. उंबरकर यांनी तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे संगणकीकृत केला. त्यानंतर तो त्यांना मराठीत वाचुन हिंदीतुन समाजावून सांगितला तो त्यांनी सांगितल्याप्रमाणे बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी सदर अर्जावर सही केलेली असल्याचे सांगितले.

दिनांक २०/०६/२०२६ रोजी पडताळणी मधील तक्रारदार महिला पुष्पा कमलुरी ह्या पडताळणीच्या अनुषंगाने लाप्रवि मुंबई येथे उपस्थित झाले असता. त्यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे नाव श्रीमती पुष्पा राजेश कमलुरी, वय ३३ वर्षे, व्यवसाय-हाऊस किचन, रुम नं. ६९५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, न्यु धोबीघाट जवळ, साधु टी एल वासवानी मार्ग कुलाबा, कफपरेड, मुंबई ४००००५ असे असुन दि. २६/०५/२०२६ रोजी तक्रारदार यांनी त्यांचे राहते घरासमोरील गल्लीमधील गटारची लाईन चेंबर्ससह नवीन बांधून घेण्यासाठी बी एम सी ची परवानगी मिळावी म्हणुन घनकचरा व्यवस्थापन, ए वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका येथे अर्ज केला असून सदरची परवानगी देण्यासाठी लोकसेवक दुय्यम अभियंता जैस्वाल यांनी लाचेची मागणी केली आहे असे सांगितले.

दिनांक १६/०६/२०२६ रोजी झालेल्या पडताळणीमध्ये तक्रारदार यांना लोकसेवक यांनी दि.२०/०६/२०२६ रोजी बोलाविले असल्याने दि.२०/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाईचे आयोजन करण्यात आले. त्याप्रमाणे पंच व तक्रारदार हे लाप्रवि कार्यालयास हजर झालेनंतर त्यांना माझी व मी त्यांची ओळख करून घेतली. त्यानंतर दि.१६/०६/२०२६ रोजी झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांना पंचाचा संशय आला असल्याने त्यांनी लाचेच्या रक्कमेविषयी बोलने टाळले होते म्हणुन तक्रारदार यांनी पंच चाचे या त्यांच्या सोबत पुन्हा आल्यास लोकसेवकांचा संशय वाढेल व ते लाचेच्या रक्कमेबाबत बोलणे करणार नाहीत त्यामुळे तक्रारदार या एकटयाच लोकसेवकास भेटण्यास जातील व बालेणे करतील अशी विनंती केली. म्हणुन पंच क्र.१ श्रीमती चाचे यांना तक्रारदार यांच्या सोबत जातील पण लोकसेवक यांचे केबीनमध्ये न जाता थोडया अंतरावर जवळच थांबून राहतील असे ठरले. त्याप्रमाणे पडताळणी कारवाईचे आयोजन करण्यात आले. नमुद पडताळणी दरम्यान लोकसेवक हे रजेवर असून सोमवारी येणार असल्याचे मनपा कार्यालयातून माहिती मिळाल्याचे तक्रारदार यांनी सांगितले. त्याप्रमाणे नमुद दिवशीची पडताळणी कारवाई स्थगित करून तक्रारदार यांना सोमवार दि.२२/०६/२०२६ रोजी लाप्रवि कार्यालयास हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक यांना संशय आला असल्यामुळे ते सुट्टीवर गेले असतील अशी शंका व्यक्त करून दिनांक २२/०६/२०२६ रोजीची कारवाई ही थोडया दिवसांचा कालावधी गेल्यानंतर पुन्हा करू अशी आम्हांला विनंती केली. तसेच लोकसेवक यांना भेटण्यास जाताना सोबत पंच आल्यास संशय वाढेल व ते लाचेच्या रक्कमे संदर्भात बोलणार नाहीत, त्यामुळे तक्रारदार या एकटयाच लोकसेवकास भेटण्यास जातील व बोलणे करतील अशी तक्रारदार महिला कमलुरी यांनी विनंती केली असल्यामुळे पुढील कारवाईचे वेळी सदरबाबत सुचना देण्याचे ठरले. सदरबाबत पंचनामा कारवाई करण्यात आली.

त्यानंतर दि.१०/०७/२०२६ रोजी पुढील पडताळणी कारवाई करण्याचे ठरल्यामुळे त्याप्रमाणे पंच व तक्रारदार यांना संपर्क करून लाप्रवि कार्यालयास हजर राहणेबाबत कळविण्यात आले. दोन्ही शासकीय पंच व तक्रारदार हे लाप्रवि कार्यालयास हजर झालेनंतर पडताळणी कारवाईचे नियोजन ठरले तसेच कारवाईचे वेळी पंच क्र.२ गुजर यांना तक्रारदार यांच्या सोबत पाठविण्याचे ठरले. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली. सदरवेळी लोकसेवक हे कार्यालयात हजर नसुन मिटींगकरीता बाहेर गेले असल्याचे मनपा कार्यालयातून तक्रारदार यांना समजले. त्याप्रमाणे काही वेळ थांबून त्यानंतर लोकसेवक यांना मोबाईलव्दारे संपर्क करून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे ठरले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांचे मोबाईलवरून लोकसेवक यांच्या मोबाईल फोनवर संपर्क करण्यात आला. सदरवेळेचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मायक्रो एसडी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आले. सदर संभाषणात लोकसेवक यांनी तक्रारदार यांना मनपा कार्यालयास येण्याची गरज नसून लेटर व्हॉट्सअप करण्यास सांगितले तसेच भेटण्याची तारीख व वेळ नंतर कळवतील असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक यांचा तक्रारदार यांना फोन आल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे ठरले व दिनांक १०/०७/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. सदरबाबत पंचनामा कारवाई करण्यात आली.

त्यानंतर तक्रारदार महिला श्रीमती पुष्पा राजेश कमलुरी यांनी मला दि.०६/०८/२०२६ रोजी संपर्क करून त्या दि. ०७/०८/२०२६ रोजी लाप्रवि कार्यालयास येत असल्याबाबत कळविले. त्याप्रमाणे मी दोन्ही शासकीय पंच यांना संपर्क करून लाप्रवि कार्यालयास दि.०७/०८/२०२६ रोजी हजर राहण्याबाबत कळविले. दोन्ही पंच व तक्रारदार लाप्रवि कार्यालयात माझे समक्ष हजर झालेनंतर सपोआ. सावंत व दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार महिला कमलुरी यांनी यापुर्वी झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान जैस्वाल साहेबांना संशय आलाने त्यांनी लाचेची मागणी केली नाही तसेच परवानगी देण्याचे काम केले नाही. तसेच लोकसेवक काम करतील की नाही अशी भिती वाटत होती. कारवाईच्या कामामध्ये बराच वेळ जात होता व त्यांचे व्यसायीक नुकसान होत होते. म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवकास परस्पर कॉल करून परवानगी देण्याची विनंती केली होती. लोकसेवक परवानगी देण्याचे आश्वासन देवुन ही परवानगी देत नसल्यामुळे त्या दि. २७/०७/२०२६ रोजी लोकसेवकांना यांच्या कार्यालयात जाऊन भेटल्या. त्यावेळी लोकसेवक जैस्वाल यांनी काम करण्याचे आश्वासन देऊन रू.२०,०००/- ची मागणी करून सदरचे पैसे खुशीने देण्यास सांगीतले व फोन करणार तेव्हा येण्यास सांगितले. तसेच दिनांक ०६/०८/२०२६ रोजी तक्रारदार महिला कमलुरी यांना लोकसेवक जैस्वाल यांनी फोनवरून त्यांचे परवानगीचे काम झाले आहे असे सांगुन दि.०७/०८/२०२६ रोजी भेटण्यास

बोलाविले असल्याची हकीकत सांगितली. त्यामुळे तक्रारदार महिला कमलुरी या दि.०७/०८/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात उपस्थित राहुन पोलीसांना लोकसेवक जैस्वाल हे पुन्हा लाचेची मागणी करण्याची शक्यता असल्याने पुढील कार्यवाही करण्याची विनंती केली.

दिनांक ०७/०८/२०२६ रोजी पडताळणी कारवाईचे नियोजन करण्यात आले व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली. तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्र. २ गुजर यांच्यासह लोकसेवक यांचे कार्यालयात रवाना केले. सदरवेळी पंच क्र. २ यांना लोकसेवक यांना संशय आला असल्याने ते तक्रारदार यांच्या सोबत व्यक्ती असल्यास लाचेचे रक्कमेबाबात बालेणार नाहीत म्हणुन तक्रारदार यांच्या सोबत जातील पण लोकसेवक यांचे केबीनमध्ये न जाता थोडया अंतरावर जवळच थांबून राहतील व लक्ष ठवतील असे सांगितले. काहीवेळाने तक्रारदार हे पंच क्र.२ गुजर यांचेसोबत परत आले असता त्यांना लोकसेवक यांचेसोबत कार्यालयात झालेल्या भेटीबाबत विचारणा केली तेव्हा त्यांनी सांगितले की, सदरवेळी तक्रारदार यांचे लोकसेवक यांचेसोबत प्रलंबित कामाचे अनुषंगाने चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना परवानगीच्या अनुषंगाने पत्र देवून रूपये पंधरा हजाराचे चलान भरण्यास सांगितले व सदरचे पैसे तक्रारदार यांना परत मिळणार असल्याचे सांगितले. त्यानंतर दिलेल्या पत्रावर रिसीव्हकॉपी घेताना त्याच्यावरती तक्रारदार यांना मागील तारीख ०८/०६/२०२६ ही टाकून सही करण्यास सांगितले. तसेच चर्चेदरम्यान लोकसेवक हे तक्रारदार यांना **''ज्यादा मसला नही करना है. चुपचाप काम करना है. प्यार से काम करना है. जो भी आपका. ठिक है''** असे म्हणाले. तसेच लोकसेवक सदरचे काम '' **फाईन बिना करके दिया हुं. ठिक है''** असे ही म्हणाले. तसेच **''आपके लिये किया है. नही तो आपका काम नही होगा''** याप्रमाणे सदरचे काम फक्त तक्रारदार यांच्यासाठीच केले असल्याचे सांगितले, सदरवेळी तक्रारदार यांनी लोकसेवक यांस **''अभी आपको कितना देना है''** असे विचारले असता **''आपके हिसाब से, आपको जैसे लगेगा, बाद मे आप कर दे, ठिक है,... आप के लिये किया. नही तो ये सब चिजे मै करता ही नही''** असे बोलून स्व:खुशीने बक्षीस स्वरूपात लाचेची मागणी करून सोमवारी परत कार्यालयास येण्याबाबत सांगितले. याप्रमाणे तक्रारदार कमलुरी यांनी हकीगत सांगितली.

वरील तक्रारदार व लोकसेवक यांचे प्रत्यक्ष झालेल्या भेटीदरम्यान झालेल्या ध्वनिमुद्रीत संभाषणावरून लोकसेवक जैस्वाल यांनी तक्रारदार महिला कमलुरी यांना परवानगीचे पत्राच्या मोबदल्यात त्यांनी केलेल्या सरकारी कामाबद्दल बक्षीस स्वरूपात लाचेची मागणी करित असल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक यांनी बक्षीस स्वरूपात लाचेची मागणी करून परवानगीसाठी आवश्यक असलेल्या डिपॉजीटची कारवाई करून दिनांक १०/०८/२०२६ रोजी ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथे येण्यास सांगितल्यामुळे पुढील कारवाई ही दिनांक १०/०८/२०२६ रोजी करण्याचे ठरले. सदरबाबत पंचनामा करण्यात आला.

दिनांक १०/०८/२०२६ रोजी पुढील कारवाई करिता तक्रारदार यांना संपर्क केला असता त्यांनी त्या आजारी असल्यामुळे हजर राहु शकत नाहीत आजारामधुन बरे झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय, वरळी येथे येत असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी दिनांक १७/०८/२०२६ रोजी त्या कार्यालयामध्ये हजर होत असल्याचे कळविले म्हणुन दि. १७/०८/२०२६ रोजी पुढील पडताळणी/सापळापुर्व कारवाई करण्याचे ठरले. त्याप्रमाणे पंच व तक्रारदार यांना संपर्क करून लाप्रवि कार्यालयात हजर राहणेबाबत कळविण्यात आले.

दिनांक १७/०८/२०२६ रोजी दोन्ही शासकीय पंच व तक्रारदार हे लाप्रवि कार्यालयास हजर झालेनंतर पडताळणी/सापळापुर्व कारवाईचे नियोजन करण्यात आले व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली. तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्र. २ गुजर यांच्यासह लोकसेवक यांच्या कार्यालयात रवाना केले. काहीवेळाने तक्रारदार हे पंच क्र.२ गुजर यांचेसोबत परत आले असता त्यांना लोकसेवक यांचेसोबत कार्यालयात झालेल्या भेटीबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, सदरवेळी तक्रारदार यांची लोकसेवक यांचेसोबत प्रत्यक्ष भेट झाली. त्यावेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडून रू.५००/- चा स्टँम्प पेपर घेऊन तक्रारदार यांना पंधरा हजाराचे चलान तयार करून दिले व ते भरण्यास सांगितले. सदर चर्चेदरम्यान तक्रारदार यांनी यापुर्वी परस्पर भेटीदरम्यान लोकसेवक यांनी केलेल्या लाचेच्या मागणीबाबत विचारणा केली असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांना '' **जो देना है दिजीये ना मॅडम क्या?** असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार यांनी '' **आप बोलेंगे तो** '' अशी विचारणा केली असता लोकसेवक यांनी **'' मै कुछ भी बोलुंगा. मै दो लाख बोलुंगा आप देंगे क्या? वैसा नही. ठिक है ना. जितना आप कर सकती है, उतना कर दिजीये. ''** असे म्हणाले सदरवेळी तक्रारदार यांनी '' **पहिला तो बोले थे. पहिला आप बोले थे, बीस हजार रूपया.''** असे विचारले असता, लोकसेवक **''बीस बोला बीस देदो. आपकी इच्छा है. आपको ज्यादा लगता है तो कम कर दो. बढा दो. ज्यादा लगे तो ठिक से करो''** असे म्हणाले, त्यावर तक्रारदार यांनी **''कितना बीस ना?'' असे विचारले असता ''हा. हा. पहिले आपका काम मस्त करके लो. दिक्कत नही. वो तो पैसा भरके आईये.''** असे बोलून स्व:खुशीने बक्षीस स्वरूपात रू. २०,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळापुर्व कारवाईचे नियोजन करण्यात आले व त्याप्रमाणे तक्रारदार यांचेकडे अॅन्थ्रसीन पावडर लावलेली रक्कम रूपये २०,०००/- देवून त्यांना व्हाईस रेकॉर्डर लावून पंच क्र.०२ गुजर यांचेसह लोकसेवक यांचे कार्यालयात रवाना केले. काही वेळाने तक्रारदार हे पंच क्र.०२ गुजर यांचेसोबत परत आले असता. त्यांना लोकसेवक यांचेसोबत कार्यालयात झालेल्या भेटी बाबत विचारणा केली असता. त्यांनी सांगितले की, सदरठिकाणी गेलेनंतर त्या लोकसेवक यांचे केबीनमध्ये जात असताना. तेथे हजर असलेल्या महिला कर्मचारी यांनी तक्रारदार यांना **''साहेब इलेक्शन ड्युटीला गेलेत, ओल्ड कस्टम ऑफीसला गेलेत''** असे सांगितले. लोकसेवक परत येणार का असे विचारल्यानंतर त्यांनी **''आयेंगे. टाईम लगेगा''** असे सांगितले. लोकसेवक हे कार्यालयात नसून बाहेर गेल्याचे समजल्यामुळे तक्रारदार या पोलीस वाहनाजवळ परत आल्या. याप्रमाणे तक्रारदार महिला कमलुरी यांनी हकीगत सांगितली. त्यानंतर मी तक्रारदार यांना त्यांच्याकडील लाचेची रक्कम रक्कम रू.२०,०००/-(रूपये ५००/- दराच्या ४० भारतीय चलनी नोटा ) पंचांसमक्ष हजर करण्यास सांगून सदरची रक्कम ही परत केली व पडताळणीच्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाईकरीता वापरण्यात येणारी रक्कम रूपये २०,०००/- च्या भारतीय चलनी नोटा या बदलून आणण्याच्या सुचना दिल्या.

दिनांक १९/०८/२०२६ रोजी मी वेळेअभावी दोन्ही पंचांस व तक्रारदार यांना सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंम्पाऊंड, मी.एस.टी.स्टेशन जवळ, मुंबई ०१ येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे दोन्ही पंच व तक्रारदार सदरठिकाणी हजर झालेनंतर सापळा कारवाईचे नियोजन करण्यात आले व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली. लोकसेवक यांना कार्यालयात भेटण्यास जाण्यापुर्वी भेटण्याची वेळ निश्चित करण्यासाठी तक्रारदार यांच्या मोबाईल फोन क्र. ७९०००९३९३८ यावरुन लोकसेवकास त्यांचे मोबाईल फोन क्र. ९०९६२०८९३१ यावर संपर्क करून फोन स्पिकरवर ठेवून सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मायक्रो एसडी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आले. सदरवेळी लोकसेवक यांनी ते बाहेर असून संध्याकाळी पाच वाजता फोन करून कार्यालयात भेटण्यास बोलाविले. त्यावेळी पुन्हा एकदा तक्रारदार यांचे मोबाईल फोनव्दारे लोकसेवक यांना फोन करून संपर्क केला असता लोकसेवक यांनी लगेच कार्यालयात भेटण्यास बोलाविले. सदरचा फोन कॉलही ध्वनीमुद्रीत करण्यात आला आहे. सदरवेळी मी तक्रारदार यांना दि.१७/०८/२०२६ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान सुचना दिल्याप्रमाणे त्यांनी लाचेची रक्कम म्हणून वापरण्यात येणारी रक्कम रूपये २०,०००/- च्या भारतीय चलनी नोटा बदलून आणल्या होत्या त्या पंचासमक्ष हजर केल्या. सदर नोंटांना चालकामार्फत अॅन्थ्रसीन पावडर लावून त्या लिफाफ्यामध्ये टाकून लिफाफ्यावर अॅन्थ्रसीन पावडर लावून तो लोकसेवक यांना देण्याकरीता तक्रारदार यांनी आणलेल्या पिशवीमध्ये टाकून तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर लावून पंच क्र.०२ गुजर यांचेसह लोकसेवक यांचे कार्यालयात रवाना केले व इतर सर्व सापळा पथकास खबरदारीच्या सुचना दिल्या. त्यानंतर पथक तक्रारदार यांच्या पाठोपाठ लोकसेवक यांचे कार्यालयाच्या आवारात संशय येणार नाही अश्यारितीने थांबले.

काहीवेळाने तक्रारदार श्रीमती कमलुरी यांनी दुय्यम अभियंता ( घ.क.व्य.), ए विभाग केबिनच्या बाहेर येवून सापळा पथकाला हाताच्या बोटाचा थम्स अप दाखवून लोकसेवकाने लाच स्विकारल्याबाबत पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने दुय्यम अभियंता ( घ.क.व्य.), ए विभाग अशी पाटी असलेल्या केबिनच्या आत प्रवेश करून लोकसेवक जैस्वाल यांना जागीच अटकावून ठेवले. त्यानंतर मी लोकसेवक जैस्वाल यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता, त्यांनी श्री. राधेश्याम विजयप्रसाद जैस्वाल, वय ३९ वर्षे, व्यवसाय - नोकरी दुय्यम अभियंता, नेमणूक - ए वॉर्ड, घन कचरा व्यवस्थापन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई रा.ठि. - रूम नं. ०३, तळ मजला, महानंदा को. ऑप. हौ. सोसायटी, आयकॉन हॉस्पिटलजवळ, मानपाडा रोड, सरला नगर, डोंबिवली पूर्व, कल्याण ४२१२०१. कायमाचा पत्ता - मु. पो. शेंदुरवाडा, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजी नगर मोबाईल क्र. ८३६९४२४७६८/९०९६२०८९३१. सांगितला.

त्यानंतर पुढील सापळा कारवाई करण्यात आली. सदर सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडून स्विकारलेली लाचेची रक्कम रू. २०,०००/- ही हस्तगत करण्यात आली. तसेच सापळा कारवाई अंतर्गत लोकसेवक जैस्वाल यांच्या कार्यालयाच्या झडतीमध्ये तसेच अंगझडतीमध्ये एकूण रू.७,०६,०३०/- रक्कम मिळून आली होती. त्यापैकी रक्कम रू. ६,९४,६५०/- याबाबत लोकसेवक जैस्वाल यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने सदर रक्कम पंचांसमक्ष ताब्यात घेण्यात आली. नमुदवेळी लोकसेवकास तक्रारदार यांचा अर्ज व दिलेला ५००/- रूपयाचा स्टॅम्प पेपर बाबत विचारणा केली असता लोकसेवक यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना ताब्यात घेऊन पुढील चौकशीकरीता लाप्रवि कार्यालयास घेऊन जात असलेबाबत सपोआ सावंत यांच्यामार्फतीने त्यांचे वरिष्ठ उज्वल यादवराव इंगोले, पद- सहाय्यक आयुक्त, नेमणुक - ए वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई यांना समक्ष भेटून माहिती देऊन लोकसेवक जैस्वाल, तक्रारदार, पंच व पथकासह पोलीस वाहनाने लाप्रवि मुंबई कार्यालयास आलो व सदरबाबत पंचनामा कारवाई करण्यात आली.

तरी लोकसेवक श्री. राधेश्याम जैस्वाल, वय- ३९ वर्ष,व्यवसाय- नोकरी (दुय्यम अभियंता, नेमणुक- (घकव्य), ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांनी तक्रारदार नामे श्रीमती पुष्पा राजेश कमलुरी यांचे गटारची लाईन चेंबर्ससह नवीन बांधून घेण्यासाठी केलेल्या अर्जावर परवानगी देण्याकरीता दि. ०७/०८/२६ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांना परवानगी पत्र सुपुर्द करताना रिसिव्ह दिनांक ०८/०६/२६ अशी पुर्वीची टाकण्यास भाग पाडुन तसेच सदरचे काम हे ''आपके लिये किया है'' असे बोलून हेतुपुरस्सर अप्रामाणिकपणे कृत्य करून काम केले. तसेच नमुद दिलेल्या परवानगी पत्राच्या मोबदल्यात दि. १७/०८/२६ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान कायदेशिर रक्कमेशिवाय गैरवाजवी फायदा प्राप्त करण्याच्या हेतुने बक्षिस स्वरूपात रू. २०,०००/- लाच मागणी करून दि. १९/८/२६ रोजी सापळा कार्यवाहीदरम्यान दरम्यान स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणुन माझी लोकसेवक श्री. राधेश्याम जैस्वाल यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठित टंकलिखीत केला असुन, तो मी वाचुन पाहिला असता तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(दयानंद सावंत )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तक्रारदार यांच्या अर्जावरून पडताळणी व सापळा कारवाईनंतर दाखल.

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..................................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........................................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........................................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील तारीख वेळी व नमूद ठिकाणी यातील कॉलम क्र. ०७ मधील लोकसेवक यांनी तक्रारदार यांना व्यवसायाच्या अनुषंगाने गटारी लाईन चेंबर बांधकामकरिता केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने परवानगी दि. ७/८/२५ रोजी देताना तक्रारदार यांना रिसिप्ट दि. ८/७/२५ असा पूर्वीचा टाकण्यास भाग पडून तसेच स्वतःचे काम है " आपके लिए किया " असे बोलून हेतुपुरस्कर अप्रामाणिकपणे कृत्य करून काम केले तसेच दिलेल्या परवानगी पत्राच्या मोबदल्यात कायदेशिर रक्कमे शिवाय गैरवाजवी फायदा प्राप्त करण्याच्या हेतून बक्षिस स्वरुपात रु. २९०००/- लाच रकमेची मागणी करून ती स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून नोंद

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : प्रतिक्षा राजेंद्र ढोकणे पद: पोलीस निरीक्षक. ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................................... जिल्हा .............. राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ................................................

(3) Transferred to P. S. ..................................
District .................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name दयानंद सावंत

पदनाम Rank सहाय्यक पोलिस आयुक्त

तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ..........................................................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........................................

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report